# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः19.02.2025 वारःबुधवार

---

- सहावा राज्य वित्त आयोग स्थापन करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता

- राज्यात अंमली पदार्थ विरोधी कृती दल स्थापन करण्यासही मंत्रिमंडळाची मंजुरी

- राज्यात आज सर्वत्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा उत्साह, सर्व जिल्ह्यात ‘जय शिवाजी जय भारत’ पदयात्रेचं आयोजन

आणि,

- दिल्लीत होणाऱ्या 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी जाणाऱ्या रेल्वेगाडीत ‘मराठी साहित्ययात्री संमेलन’

**<u>मंत्रीमंडळनिर्णय</u>**

सहावा राज्य वित्त आयोग स्थापन करण्यास काल झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले. हा आयोग 1 एप्रिल 2026 ते 31 मार्च 2031 या पाच वर्षांच्या कालावधीसाठी शिफारशी करेल. या शिफारशींबाबत अहवाल सादर करण्यास या आयोगाला 31 डिसेंबर 2025 पर्यंत मुदत असेल. सहावा राज्य वित्त आयोग पंचायती आणि नगरपालिका यांच्या आर्थिक स्थितीचं पुनर्विलोकन करून विविध उपाययोजना सुचवेल.

कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजनेअंतर्गत विविध कामांसाठी एक हजार 594 कोटी रुपयांना काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. म्हैसाळ उपसा सिंचन योजनेसाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे आणि योजनेची ऊर्जा कार्यक्षमता सुधारण्यासाठी ह्या निधीची तरतूद करण्यात येणार आहे. ह्या प्रकल्पामुळे योजनेसाठी दरवर्षी लागणाऱ्या सुमारे 398 दशलक्ष युनीट वीजेची गरज भागवली जाणार आहे.

जळगांव जिल्ह्यामधल्या वरखेडे लोंढे या मध्यम प्रकल्पाच्या एक हजार 276 कोटी रुपयांच्या सुधारित तरतूदीसही काल मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे चाळीसगाव आणि भडगाव तालुक्यातल्या सुमारे 8 हजार हेक्टर क्षेत्राला सिंचन सुविधा उपलब्ध होणार आहे.

राज्यात अंमली पदार्थ विरोधी कृती दल स्थापन करण्यास तसंच त्यासाठीच्या 346 पदांना आणि संबंधित खर्चालाही कालच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

पुण्यातल्या दीनानाथ मंगेशकर फाऊंडेशन हॉस्पिटल मेडिकल रिसर्च सेंटरला नाल्यावरील पुलाच्या बांधकामासाठी वार्षिक रुपया 1 इतक्या नाममात्र भाडेपट्ट्यानं जमीन देण्यासही या बैठकीत मान्यता देण्यात आली. पुलाच्या बांधकामाचा खर्च फाऊंडेशन करणार आहे.

**छ.संभाजीमहाराज**

छत्रपती संभाजी महाराजांबद्दल विकिपीडिया या संकेतस्थळावरील चुकीची आणि खोटी माहिती हटविण्याबाबत राज्याच्या सायबर विभागाच्या महासंचालकांना सूचना देण्यात आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. सोशल मीडियाला भौगोलिक सीमा नसल्यानं त्याच्या नियमनात अडचणी येतात, तरीही अश्या प्रकारे सोशल मीडिया वर चुकीची माहिती येऊ नये यासाठी कायदा करण्याबाबत केंद्र सरकारसोबत चर्चा करणार असल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं.

**कौशल्य-प्रशिक्षण**

पुण्यातल्या औंधमधल्या छत्रपती शिवाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत नवनियुक्त शिल्पनिदेशकांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचं उद्घाटन कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते करण्यात आलं. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण तसंच प्रशिक्षण संचालनालय यांच्या वतीनं दरवर्षी पाच हजार प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्याचं शासनाचं लक्ष्य असल्याचं लोढा यांनी सांगितलं.

**शिवजयंती**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आज पुण्यासह राज्यातल्या सर्व जिल्ह्यात ‘जय शिवाजी जय भारत’, ही पदयात्रा काढण्यात येणार आहे.

राज्यातला मुख्य कार्यक्रम पुण्यात होत असून केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ही पदयात्रा काढण्यात येणार आहे.

केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यासह राज्याचे मंत्री आणि 20 हजार माय भारत स्वयंसेवकही या पदयात्रेत सहभागी होणार आहेत. पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणापासून फर्ग्युसन महाविद्यालयापर्यंत ही पदयात्रा जाईल.

यामुळे सकाळी ७ ते दुपारी दोन या वेळेत या भागातल्या रस्त्यांवरच्या वाहतुकीत आवश्यकते प्रमाणे बदल करण्यात येणार आहेत. नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा असं आवाहन पोलिसांच्या वाहतूक विभागानं केलं आहे.

राज्यातल्या सर्व 36 जिल्ह्यांमध्येही आज एकाच वेळी अशा प्रकारच्या पदयात्रा काढण्यात येणार असून, शिवजयंतीचं औचित्य साधून विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे.

बदलापूर इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल झालं. संविधान आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांनी प्रेरित होऊन राज्य सरकार काम करत असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण इथं राजकोट किल्ला परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचं काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीनं केलं जाणार आहे. या पुतळ्याच्या कामाचा पायाभरणी समारंभ पालकमंत्री नितेश राणे यांच्या उपस्थितीत केला जाणार आहे.

सोलापुरात 7 शिवभक्तांनी सलग 19 तास 19 मिनिटे 19 सेकंद दांडपट्टा फिरवून शिवरायांना अभिवादन केलं आहे.

ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्टस असोसिएशन महाराष्ट्र राज्य आणि भारतीय लाठी महासंघ यांनी संयुक्तपणे या उपक्रमाचं आयोजन केलं होतं. या विक्रमाची आयडल इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड आणि युनिकॉन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद घेतली जाणार आहे.

परभणी जिल्ह्यात जिंतूर तालुक्यातल्या कौसडी इथल्या जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर विद्यार्थ्यांनी मानवी साखळीद्वारे शिवरायांची प्रतिकृती प्रशालेच्या प्रांगणात साकारली. तसंच भव्य रांगोळीही रेखटण्यात आली होती.

धुळे शहरातल्या मोहाडी उपनगरात शिवरायांचा 12 फूट उंच अश्वारुढ पुतळा बसविण्यात येणार आहे. या पुतळ्याची मिरवणूक काल काढण्यात आली. या मिरवणुकीत शिवप्रेमी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

यवतमाळमधल्या पदयात्रेत ढोलताशा, लेझिम, मल्लखांब आदींची पथकं सहभागी होणार आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या लोणी इथं रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. शिवजयंती निमित्त शिवज्योत, भव्य पालखी मिरवणूक आदी कार्यक्रमांचा समावेश आहे.

वाशिममध्येही पदयात्रेदरम्यान नाट्य, पोवाडे, लाठीकाठी, दांडपट्टा यांचं प्रदर्शन करण्यात येणार आहे.

**उद्घाटन**

पुण्यातल्या आंबेगाव ब्रुद्रुक इथं साकारत असलेल्या शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचं लोकार्पणही आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. प्रतापगडावरच्या भवानी मातेच्या मंदिराची प्रतिकृती असलेल्या तुळजा भवानी मातेचं मंदिर शिवसृष्टीच्या या टप्प्यात साकारण्यात आलं आहे.

**शिवजयंती**

पुण्यातील शिवजयंती महोत्सव समितीतर्फे दर वर्षीप्रमाणे यंदाही शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ मिरवणूक काढण्यात येणार आहे. स्वराज्यरथ, ढोलताशा पथकं तसंच शिवकालीन युद्धकला सादर करणाऱ्या 51 रणरागिणी यात सहभागी होणार आहेत.

**<u>डे-विथ-कलेक्टरउपक्रम</u>**

शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी, आणि 'जिल्हाधिकारी' यांच्या कार्याची माहिती घेऊन प्रेरणा मिळावी या उद्देशानं कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या संकल्पनेतून "डे विथ कलेक्टर" हा नाविन्यपूर्ण उपक्रम जिल्हाधिकारी कार्यालयात राबविण्यात येत आहे. कणेरी इथल्या काडसिद्धेश्वर हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज या शाळेमध्ये शिकत असलेली विद्यार्थिनी आदी झिरळे हिनं या उपक्रमात सहभाग नोंदवला. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या सोबत दिवसभरात झालेल्या बैठकांना उपस्थित राहून आदी हिनं कामकाजाची माहिती घेतली. आपल्या या अनुभवाविषयी बोलतांना आदी म्हणाली..

**<u>साहित्ययात्रीसंमेलन</u>**

दिल्लीत होणाऱ्या 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सहभागी होणाऱ्या साहित्य रसिकांसाठी पुणे ते दिल्ली महादजी शिंदे एक्सप्रेस विशेष रेल्वे सेवा उपलब्ध करून दिली जाणर आहे. ही विशेष रेल्वे आज दुपारी दोन वाजता पुण्यातून निघेल आणि उद्या रात्री दिल्लीत पोहोचेल. रेल्वे प्रवासादरम्यान फिरत्या चाकांवरचं 'मराठी साहित्ययात्री संमेलन' होणार आहे. रेल्वेमध्ये होणारं हे मराठीतलं पहिलंच संमेलन असेल. रेल्वेच्या प्रत्येक डब्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांची नावं दिली जाणार आहेत. मराठी भाषामंत्री उदय सामंत या संमेलनाचे स्वागताध्यक्ष असून लेखक शरद तांदळे संमेलनाध्यक्ष आहेत. लेखक वैभव वाघ संमेलनाचे कार्यकारी अध्यक्ष आहेत. राज्यातल्या विविध गावा-गावांतील साहित्यिक, युवक, लोककलाकार, शाहिरी आणि भजनी मंडळ यात सहभागी होणार आहेत.

**<u>पिवळापळस</u>**

महाराष्ट्रात उन्हाळ्याची चाहूल लागली की सर्वत्र लालबुंद पळस फुललेला दिसतो. मात्र बुलढाणा जिल्ह्यातल्या खामगाव शहराजवळ दुर्मिळ असलेला पिवळा पळस डोंगरात एका बाजूला फुललेला दिसून येत आहे.

हा दुर्मिळ वृक्ष नामशेष होण्याच्या मार्गावर असून याकडे शासनानं तसंच पर्यावरण प्रेमी आणि  स्थानिक नागरिकांनी काळजीपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. या पळसाबद्दल जाणून घेऊया पर्यावरणप्रेमी संजय गुरव यांच्याकडून

**<u>हवामान</u>**

राज्यात हवामान सर्वत्र कोरडं राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**